<u>रे.दि.मु.क्र.४००/२०२३</u>

बाबुराव थोरात

वि.

**शिवाजी थोरात**

<u>**रे.दि.मु.नं.४००/२०२३ मधील निशाणी २७ खालील आदेश**</u>

प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र २ यांनी कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेसाठी केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र २ यांचे म्हणण्यानुसार, त्याने दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, तहसिलदार, प्रांत व जिल्हाधिकारी यांचेकडे केस दाखल केलेली आहे. त्या सर्व कामांमुळे प्रतिवादीची आर्थिक परिस्थिती बिघडलेली होती. त्यामुळे वकीलांना भेटुन त्यांची फी देणे शक्य नसल्याने कैफियत दाखल करणेस १८० दिवसांचा उशिर झालेलो आहे.तरी प्रतिवादीस कैफियत दाखल करणेची असुन झालेला विलंब माफ करणेची विनंती केली आहे.

०३. उलटपक्षी वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन, अर्ज खोटा असुन तो फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. वादीने सदरचा दावा प्रतिवादी क्र २ विरुध्द निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र २ वेळेत कैफियत दिली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द दि. ०२.११.२०२३ रोजी विना कैफियत आदेश करण्यात आला होता. असे असलेतरी अर्जात

नमुद कारणांचा विचार करीता तसेच दावा गुणदोषावर चालविण्यासाठी व दाव्याच्या निर्णयासाठी प्रतिवादी क्र २ ची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातुन प्रतिवादी क्र २ यांना त्यांची बाजु मांडण्यासाठी कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य राहील. तथापि, सदर विलंबामुळे दाव्याच्या प्रगतीस विलंब झाला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र २ यांचेवर खर्च लादून कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य राहील. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र २ नि. २७ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र २ खर्च रक्कम रुपये २००/-( दोनशे रुपये मात्र) लादून कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम वादीला अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र २ कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

४. प्रतिवादी क्र २ पुढील तारखेपर्यंत लादलेली खर्चाची रक्कम जमा न केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

PRAJAKTA GAJANAN SHELAR
Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2024.07.31 11:35:06 +0530

(पी. जी. शेलार)

स्थळ – कराड

दिनांक–३०.०७.२०२४

६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड